**<u>प्रतिवादी क्र.२ सदानंद गणपत तेली उर्फ कुवळेकर यांचा पुढील उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री. एल.एल. नाथगोसावी यांचे मार्फत शपथेवर सुरु .</u>**

४५. हे म्हणणे खरे आहे की, मी बऱ्याच मिळकती खरेदी केल्या आहेत. ज्या मिळकती मी खरेदी केल्या त्या रोखीने केल्या अगर चेक दिला होता याची मला माहीती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेल्या नोटीसीमध्ये अ.क्र.३ च्या मिळकतीची रक्कम मोतिराम यांच्याकडे पोच केली असे नमुद केले आहे. आता मला नि.क्र.५१/५ येथील नोटीसचे उत्तर दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदर उत्तरामध्ये अ.क्र.३ च्या मिळकतीची रक्कम मोतिराम यांच्याकडे पोच केली असे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासामध्ये तसेच कैफियतीमध्ये मी असा उल्लेख केला आहे की, खरेदीची रक्कम नारायण विठ्ठल चव्हाण यांना धनादेशाद्वारे दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नोटीसीतील उत्तर व कैफियत तसेच सरतपासातील मजकूर यामध्ये तफावत असल्याचे कारण म्हणजे माझा अ.क्र.३ येथील मिळकतीच्या व्यवहाराशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, नोटीसीत नमुद केल्या प्रमाणे मोतिराम हा कुटुंबांचा कर्ता व प्रमुख होता हे दर्शविणारा कोणताही लेखी पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोतिराम यांनी केलेले व्यवहार हे आमच्या कुटुंबाकरिता किंवा रामचंद्र याच्या कुटुंबाकरिता केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, गणपत वारण्या पुर्वी मोतिराम, आमचे व रामचंद्र यांचे आर्थिक व्यवहार स्वतंत्र होते. हे म्हणणे खरे नाही की, मोतिराम याच्या हयातीत त्याला कोणतीही आर्थिक मदत मी केलेली नाही. अ.क्र.३ ची मिळकत वादी याच्या हिश्याला व अ.क्र.१ व २ ची मिळकत माझ्या व भावाच्या हिश्याला घालण्यास मला विरोध आहे. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.३ ची मिळकत ही मौल्यवान असल्याने माझा विरोध आहे. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.३ च्या मिळकतीला मिळणारा बाजार भावाप्रमाणे दर अ.क्र.१ व २ च्या मिळकतीस मिळू शकत नाही. अ.क्र.३ चीमिळकत आम्ही स्वत: खरेदी केली असल्यामुळे अ.क्र.१ व २ च्या मिळकती आमच्या हिश्यास देण्यास आमचा विरोध आहे. अ.क्र.१ व २ च्या मिळकती वादीच्या हिश्यास नेमण्यास माझा विरोध आहे. अ.क्र.१ व २ च्या मिळकती वडिलोपार्जित असल्यामुळे वादीच्या हिश्यास देण्यास माझा विरोध आहे. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ ची मिळकत आम्ही खरेदी घेतली असल्याबाबत कोणताही लेखी पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१

याच्या आजारपणाबाबतचा कोणताही पुरावा न्यायालयात हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ याला दावा मिळकतीची संपूर्ण माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा खरे बोलेल याची मला भिती असल्याने मी त्याचे मुखत्यारपत्र घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९७८ अगर त्यापुर्वी मी वडिलांना आर्थिक मदत केल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९९ अगर त्यापुर्वी मी आईला आर्थिक मदत केल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. वादी यांनी दाव्याच्या परिच्छेद क्र.५ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत वाटपाची दाद मागण्यास मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.३ च्या मिळकतीचे खरेदीखत विश्वासाने मोतिराम याच्या नावे केले असल्याचे माझे म्हणणे खोटे आहे.

४६. मी व माझ्या भावाने अ.क्र.३ ची मिळकत नोकरीच्या उत्पन्नातून खरेदी केली आहे असे माझे असलेले म्हणणे हक्कसोडपत्रामध्ये नमुद करण्यास मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, छायाचित्रातील व्यक्तीचे सरतपासामध्ये केलेले वर्णन खोटे आहे. अ.क्र.३ च्या मिळकतीच्या खरेदीची बोलणी आम्ही केली असे जे माझे म्हणणे आहे ती कधी केली हे कैफियतीत व सरतपासात नमुद करण्यास मला काही अडचण नव्हती. अ.क्र.३ च्या खरेदी संबंधीचे बँक खाते उतारे प्रस्तुत प्रकरणी हजर करणार नाही. माझ्या कैफियतीमध्ये अगर सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये अ.क्र.३ च्या मिळकतीचे खरेदीखत रक्कम रु.२,०००/– इतक्या रक्कमेस झाले असे नमुद करण्यास मला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.१ व २ च्या मिळकतीत वादी कुटुंबियांनी लावून जोपासलेली झाडे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.३ च्या मिळकतीमध्ये असणाऱ्या मधुकर याच्या घराच्या पडवीला असणारे पत्रे लावण्या करिता व उलण्या करिता मी मदत केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नोटीसमीध्ये उल्लेख केलेल्या तोंडी वाटपाच्या मिळकती कोणत्या आहेत याची मला माहीती होती. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांच्याकडून करुन घेतलेले हक्कसोडपत्र हे त्यांच्यावर दबाव टाकून तसेच त्यांच्या वृध्दापकाळाचा गैरफायदा घेऊन केले आहे अशा आशयाची नोटीस वादी यांनी पाठवली होती. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.१ व २ च्या मिळकती मधील आमचा हिस्सा वादी यांच्या लाभात सोडण्यास आम्ही तयार नसल्याने वादी यांनी वाटपाचा

दावा आणला. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्र हा देवगड येथे येऊन जाऊन असतो. अ.क्र.३ च्या मिळकतीच्या बाजारभावाच्या दराने अ.क्र.१ व २ च्या मिळकतीच्या परिसरात मिळकत मिळाल्यास मी घेण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की , अ.क्र.३ च्या मिळकती इतकी किंमत अ.क्र.१ व २ च्या मिळकतीच्या परिसरात नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा भाऊ स्वार्थी व आपमतलबी आहोत. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.३ च्या मिळकतीच्या ८ गुंठे परिसरात मधुकर याचा कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कैफियतीमध्ये वादी याच्या हिताविरोधात केलेली सर्व विधाने खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात हजर केलेला कागदोपत्री पुरावा खोटा आहे. सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये परिच्छेद क्र.१४ मध्ये नमुद केल्या प्रमाणे अ.क्र.३ ची मिळकत नोकरीच्या उत्पन्नातून खरेदी केलेल्या व्यक्तव्यास अनुसरुन मी व माझ्या भावाचा नोकरीच्या उत्पन्नाचा हिशोब न्यायालयात देऊ शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपुर्ण मजकूर खोटा असून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/–

(श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

दि.०६/०३/२०२६